साहित्य न पुरवले जाते. परिणामी विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

# पंख आणि क्विकहिल फाउंडेशनतर्फे सायबर क्राइम जागृती कार्यक्रम

**पुणे :** पंख सामाजिक संस्था आणि क्विक हिल फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'शाळांगण' प्रकल्पा अंतर्गत पांडवनगर येथील हुतात्मा राजगुरु विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर क्राइम जागरूकता कार्यक्रम झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दयानंद ढोमे, क्विकहिल फाऊंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, दामिनी पथकाच्या सदस्या,पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, स्थानिक स्कुल कमिटी सदस्य दयानंद इरकल, शंकर शेटे उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक ढोमे यांनी सायबर गुन्हे, वयात येणाऱ्या मुलांच्या अडचणी व घेतले जाणारे निर्णय याविषयी मुलांशी चर्चा केली. अजय शिर्के यांनी फेसबुक, गुगल, इंटरनेट याचा योग्य वापर करावा याबद्दल मार्गदर्शन केले. प्राचार्य शंकर शेटे यांनी विद्यार्थ्यांशी या उपक्रमाविषयी चर्चा केली.